# प्रकरण दुसरे

# डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

## प्रकरण दुसरे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंदू समाजातील अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे होते.भारताच्या विविध भागात महार समाजाला बहिष्कृत, अस्पृश्य, अतिशुद्र, अत्यंत किंवा नामशुद्र असेही संबोधले जात होते. [१] अस्पृश्यतेच्या चुकीच्या रुढी परंपरेमुळे मानवता धर्म लयास गेला होता. हिंदू समाजात अस्पृश्य वर्ग व स्पृश्य वर्ग असा भेद केला गेला.अस्पृश्यांचा स्पर्शच काय पण सावलीचा ही विटाळ स्पृश्य वर्गाला होत असे.

सार्वजनिक पाणवठ्यावर त्यांना पाणी भरण्यात प्रतिबंध असे. त्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश नसे, देवळात देवदर्शनास बंदी असे जातीभेदाच्या उच्चनिचतादर्शक शिडीच्या खालच्या पायऱ्यावर अपमानीत जीवन कंठीत असणारे न्हावी व धोबी हे सुध्दा महार मांगाचा विटाळ मानीत असत. [२] त्यांचा आहार विहार कोणता असावा, त्यांची भांडी कोणत्या धातूची असावीत, दागिने कोणत्या धातूचे असावेत या सर्वावरती बंधने होती . थोडक्यात अस्पृश्य समाजावरील धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक सांस्कृतिक आणि व्यावसायिक बंधनामुळे हा समाज स्पृश्य समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने शेकडो वर्षे मागासलेला होता.

### १) डॉ.आंबेडकरांच्या चरित्राची थोडक्यात रुपरेषा

प्रतिकूल परिस्थिती असलेल्या आणि अस्पृश्य गणलेल्या महार जातीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म मध्यप्रदेशातील 'महू' येथे १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव ' रामजी ' तर आईचे नाव ' भीमाबाई ' होते. रामजी सकपाळ हे सैन्यात मेजर होते. ते सुध्दा उद्योगी, महत्वाकांक्षी नि स्वतंत्र वृत्तीचे गृहस्थ होते. रामजीच्या मनावरती संत कबीरांच्या विचारसरणीचा प्रभाव होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तीन वर्षाचे असताना वडील सेवानिवृत्त झाले. त्यामुळे ते महू मधून त्यांच्या रत्नागिरी जिल्ह्यातील 'काप –दापोली' या त्यांच्या मूळ गावी आले आणि येथेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लहानपणी मुळाक्षरे गिरविली. मिळणाऱ्या अल्पशा निवृत्ती वेतनावरती घरखर्च चालेना. त्यातच त्यांना सातारा येथील सरकारी सार्वजनिक कामाच्या विभागामध्ये

कोठावळा म्हणून नेमणूक झाली. साताऱ्यात असताना भीमाबाईचा मृत्यू झाला. मातेला पोरखा झालेल्या भीमरावांने प्राथमिक शिक्षण १८९६ साली सातारा येथील कॅम्प मिलिटरी स्कूलमध्ये घ्यायला सुरुवात केली.

## १.१ अस्पृश्यतेची जाणीव

अस्पृश्यतेच्या दंशाची जाणीव डॉ. आंबेडकरांना लहान वयातच आली होती. बाजारात दुकानदार आईपुढे दुरुन कापड टाकताना त्यांनी पाहिले होते. यातूनच अस्पृश्यतेच्या कलंकाची तीव्र जाणीव होवू लागली. आणखीन असाच एक प्रसंग डॉ. आंबेडकरांच्या लहान वयात घडला. एक दिवस डॉ.आंबेडकर, त्यांचा भाऊ आनंद आणि एक भाचा अशी तीन मुले नोकरी निमित्त कोरेगाव येथे रहात असलेल्या आपल्या वडिलांना भेटण्यासाठी निघाली. पाडळीपासून मसूरपर्यंत मुले आगगाडीने गेली. वडिलांना पत्र न मिळाल्यामुळे ते रेल्वे स्थानकावर त्यांना नेण्यासाठी येऊ शकले नाहीत. सर्व प्रवासी निघून गेले तरी ही मुले का जात नाहीत याची विचारपूस स्थानपालकांनी त्यांचे जवळ केली. डॉ.आंबेडकरांची रुबाबदार कपडे पाहून त्यांना वाटले की ही मुले कोणा सुखवस्तू गृहस्थाची असावीत पण ती एका महाराची आहेत असे कळताच ते चार पावले मागे सरले, तथापि त्यांना एक बैलगाडी भाड्याने मिळवून देण्याइतके त्यांनी सौजन्य दाखविले.

गाडी काही अंतरावर गेल्यावर मुलांच्या संभाषणावरुन गाडीवानाने हेरले की, ही मुले महाराची आहेत. आपली गाडी महारांच्या पोरांनी विटाळली असे त्याला वाटले. त्याचा संताप अनावर झाला. टोपलीतून कचरा फेकून द्यावा त्याप्रमाणे त्याने या मुलांना गाडीबाहेर फेकले. रात्रीची वेळ, खेड्यातील वातावरण, रस्त्यावर दिवा नाही, मुले गांगरली. दुप्पट भाडे देवू म्हणताच गाडीवानाचा रागाचा पारा उतरला. मुलांनी गाडी हाकावी, गाडीवानाने पायी चालावे अशी तडजोड ठरली. उन्हाळ्याचे दिवस तहानेने मुलांचा जीव कासावीस झाला. टोलनाक्यावर येताच पाण्यासाठी खूप धडपडली, पण

पाणी काही मिळेना. कोणी घाण पाण्याकडे बोट दाखवीत तर कोणी पाणी देण्याचे तिरस्काराने नाकारीत होता.दुसऱ्या दिवशी अर्धमेल्या स्थितीत ते मुक्कामास पोहोचले. [३]

इतकेच नाही तर त्यांना शाळेत वेगळे बसविण्यात येत असे, घरातून गोणपाट न्यावे लागे. काही शिक्षक वह्या पुस्तकांना हात लावीत नसत. " न्हाव्याला ही डॉ.आंबेडकरांच्या डोईचा विटाळ होई म्हणून त्यांची बहीण ओट्यावर बसून त्यांची डोई करी "[४]

या साऱ्यांचे मूळ विषम समाज व्यवस्थेत होते हे डॉ.आंबेडकरांच्या लक्षात येऊ लागले. आपणाला लोक अस्पृश्य म्हणून ओळखतात यांची जाणीव झाली.त्यामुळे अशा समाज व्यवस्थेविरुध्द मनात बंड करण्याची भावना दिवसेंदिवस वाढत गेलेली दिसते.

## २) डॉ.आंबेडकरांचे शिक्षण आणि शैक्षणिक विचारांची पार्श्वभूमी

सातार्‍यामधील वडिलांच्या नोकरीचा काळ संपला आणि डॉ. आंबेडकर मुंबईतील डबक चाळीत राहण्यास आले. त्यांनी माध्यमिक शिक्षण घेण्यास सुरुवात केली. १९०७ साली डॉ.आंबेडकर मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना ७५० पैकी २८२ गुण मिळाले.थोड्याच दिवसात त्यांचा विवाह रमाबाई या मुलीशी झाला. यावेळी डॉ. आंबेडकरांचे वय १७ ते रमाबाईचे ९ वर्षे होते.[५]

मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षणास सुरुवात केली. यावेळी अस्पृश्य समाजातील शिवराम जानबा कांबळे हे अस्पृश्य समाजात जागृतीचे काम करीत होते. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, सर नारायण चंदावरकर यांनी ' डिस्प्रेड क्लास मिशन' द्वारे अस्पृश्योध्दाराचे काम चालविले होते. यावेळी डॉ. आंबेडकर हे शिक्षण घेत होते. १९१२ साली ते बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांच्या शिष्यवृत्तीमुळे ते १९१३ साली उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी न्यूयॉर्कला गेले.

## २.१ अमेरिकेतील शिक्षण ( १९१३ते १९१६)

१९१३ ते १६ या तीन वर्षाकरीता त्यांना अमेरिकेत शिक्षण घेता आले. अमेरिकेत मात्र त्यांना वेगळा अनुभव आला. तेथे अस्पृश्यता नव्हती, भेदभाव नव्हता, कर्तृत्वाला संधी होती. आणि येथेच त्यांच्या डोक्यात विचारांचे चक्र सुरु झाले. आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या जातीच्या उत्थानाकरीता कसा करता येईल? शिक्षणाच्या प्रसाराने सामाजिक समता भारतीय समाजात आणता येईल का? हा मौलिक विचार ते करु लागले.

प्रा. आर. ए. सेलिग्मन या त्यांच्या शिक्षकांबरोबर या बाबत ते चर्चा करीत. १९१५ मध्ये प्राचीन भारतातील व्यापार (एन्शन्ट इंडियन कॉमर्स) ह्या विषयावर प्रबंध लिहून एम.ए.ची पदवी संपादन केली. १९१६ साली त्यांनी भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा (नॅशनल डिव्हीडंन्ड ऑफ इंडिया ए हिस्टॉरीक ॲन्ड ॲनॅलिटीकल स्टडी) हा प्रबंध कोलंबिया विद्यापीठाला सादर केला. आणि त्यांना 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ' ही पदवी सन्मानाने दिली.[६] अमेरिकेतील अभ्यास संपवून ते १९१६ मध्ये लंडनला आले.

## २.२ इंग्डमधील शिक्षण

'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲन्ड पोलिटिकल सायन्स' या संस्थेत अर्थशास्त्राच्या अभ्यासाकरीता प्रवेश घेतला. डी. एस. सी च्या परीक्षेची तयारी सुरु केली. १९२२ साली 'रुपयाचा प्रश्न' ( द प्रॉब्लेम ऑफ रुपी) हा प्रबंध लंडन विद्यापीठाला सादर केला आणि ते बॅरिस्टर परीक्षा ही उत्तीर्ण झाले. एम.ए., पीएच्.डी., डी. एस. सी., एल.एल.डी., बार ॲट लॉ इतक्या पदव्या जागतिक किर्तीच्या विद्यापीठांमधून घेतल्या आणि भारतात परत आल्यानंतर आपल्या शिक्षणाचा व ज्ञानाचा वापर हजारो वर्षे अज्ञान अंधकाराच्या चिखलात जसा ऐरावत रुतावा तसा रुतलेल्या अस्पृश्य दलित बांधवांच्या उन्नती आणि उत्कर्षासाठी करण्याचे ठरविले. शिक्षणाचे महत्व सांगताना ते म्हणतात,

" शिक्षण नसेल तर माणूस मानसिकदृष्ट्या गुलाम बनेल, सांस्कृतिकदृष्ट्या पंगू बनेल, आर्थिक दृष्ट्या दरिद्री बनेल आणि सामाजिक दृष्ट्या मागास बनेल. या सर्वावरती एकच उपाय म्हणजे शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही."

उच्च शिक्षण घेवून भारतात परत आल्यानंतर त्यांच्या सामाजिक कार्याला १९२० साली खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. माणगाव परिषदेमध्ये छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बद्दल म्हणाले,

" माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाननांनो तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला या बद्दल मी तुमचे अंत:करण पूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उध्दार केल्या शिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील माझी मनोदेवता मला असे सांगते. " [७]

छ. शाहू महाराजांचा हा द्रष्टेपणा पुढे प्रत्यक्षात उतरला आणि पुढच्या काळात अखील भारतीय दलित समाजाचे नेतृत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. इतकेच नव्हे तर स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिण्याचेही काम डॉ.आंबेडकरांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कृतीवरती महत्मा फुले यांचा प्रभाव होता. त्याच बरोबर कोल्हापूर संस्थानामध्ये छ.शाहू महाराजांनी अस्पृश्य लोकांसाठी केलेल्या अमूल्य सुधारणा डॉ. आंबेडकरांनी पाहिल्या होत्या.१९०२ चा मागासवर्गीयांना ५० टक्के आरक्षण देणारा कायदा, १९१७ सालचा प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचा कायदा अशी अनेक महत्वाची कामे छ.शाहू राजांनी आपल्या प्रजेसाठी केलेली होती. यांचाही प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वरती झालेला होता. म्हणूनच त्यांची शैक्षणिक विचारधारा म.फुले, शाहू महाराज यांच्या सारखीच मागासवर्गीयांच्या प्रगतीसाठीची होती.

## २.३ शैक्षणिक विचारांची प्रखरता

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याची सुरुबात जरी १९२० पासून झाली असली तरी दलित्तोध्दाराबाबतची आपली परखड मते त्यांनी उच्च शिक्षण घेत असतानाच मांडलेली दिसतात. विशेष करुन मुलींच्या शिक्षणाबाबत भारतीय समाज हा नेहमीच पक्षपाती राहिला आहे. या संबंधीचे आपले विचार त्यांच्या वडीलांचे मित्र शिवनाक गौनाक जमेदार (पोईमकर) यांना अमेरिकेहून ४ ऑगष्ट १९१३ साली पत्र लिहून कळविले त्या पत्रामध्ये कळतात.या पत्रात ते म्हणतात,

"पालक मनात आणतील तर ते आपल्या मुलांचे भवितव्य साकारु शकतात. पण या तत्वांचा अंगीकार केला तर आणि त्यानुसार कृती केली तर आपणास चांगले दिवस येतील आणि प्रगती पथावर आपली वाटचाल अधिक गतीने होईल. याकरिता मुलांच्या शिक्षणासोबत आम्हांला मुलींच्या शिक्षणाचाही तेवढ्याच गंभीरतेने विचार करावा लागेल आणि त्यानुसार कृती करावी लागेल".[८] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींनाही शिक्षण मिळाले पाहिजे असे विचार त्यांनी विद्यार्थी दशेतच मांडल्याचे या पत्रातून दिसते.

प्रस्थापित समाज व्यवस्थेने शेकडो वर्षे शिक्षण हे एकाच वर्गाची मक्तेदारी बनविली. यामुळे मागासवर्गीयांना शिक्षण मिळणे दुरापास्त झाले.मागासर्गीयांच्या अज्ञान आणि मागासलेपणाचे कारण शिक्षण न मिळणे आहे व त्याला जबाबदार येथील समाजव्यवस्थाच आहे. यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रस्थापित मनूवादी समाज व्यवस्थेवर आगपाखड करताना म्हणतात,

" येथील मनूवादी समाजव्यवस्थेमुळे बहुजन समाजाच्या शेकडो पिढ्या शिक्षणाअभात्री गुलामीचे जिणे जगून गेल्या. यामध्ये सुधारणा करायची असेल किंवा उन्नती साधायची असेल तर सरकाराला या वर्गाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष न करण्याचे तर बहुजन समाजाला शिक्षण घेण्याचे आवाहन करतात. आज हिंदूस्थानात जीवंत असलेला

सहा साडेसहा कोटी बहिष्कृत समाज जीवंत असला तरी फक्त शरीराने जीवंत आहे. त्याच्याकडे सरकारने दुर्लक्ष करणे योग्य नाही. आणि आजपर्यंत अज्ञान अंधकारात दडपल्या गेलेल्या या सहा कोटी प्रजेनेही आपली झोप पुरी करुन सभोवार चाललेल्या चढाओढीकडे लक्ष देणे अत्यंत जरुर आहे. आणि म्हणूनच आपल्या खऱ्या उन्नतीचे साधन जे शिक्षण ते अगदी मोठ्या अधाशीपणाने आत्तापासूनच प्राशन करीत जाऊन इतराबरोबर सुधारणेच्या चढाईत आपला ही नंबर वरतीच पटकाविण्याची संधी व्यर्थ दवडू नये. " [१]

## ३. प्राथमिक शिक्षणाबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० पासून आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. समाजाच्या प्रगतीचे महत्वाचे साधन म्हणजे शिक्षण हे त्यांनी ओळखले होते आणि मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी शिक्षणाशिवाय तरणोपायच नाही यावर त्यांचा अढळ विश्वास होता म्हणून त्यांनी मागावर्गीयांच्या प्राथमिक शिक्षणावर भर दिलेला आहे.

## ३.१ प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत

आपण घेत असलेल्या शिक्षणाचा उपयोग करोडो मागासवर्गीय, दीन दुबळया, अस्पृश्य लोकांसाठी झाला पाहिजे. यासाठी बाबासाहेबांनी चांगल्या पगाराच्या नोकऱ्या, मानमरातबाच्या जागा, नाकारुन सामाजिक कार्यात उडी घेतली. प्रस्थापित समाजव्यवस्थेने मनूवादी धार्मिक कायद्याच्या आधारे विषम समाजरचना निर्माण केल्याने बहुसंख्य असलेल्या या मागासवर्गीय जनतेला गुलामीचे जगणे जगावे लागले. तोंड असून ज्यांना बोलता येत नव्हते किंबहुना धर्मव्यवस्थेने त्यांचा बोलण्याचा हक्कच हिरावून घेतला होता. हे सर्व शिक्षण नसल्यामुळे घडले होते. याची पुर्ण जाणीव असल्याने डॉ.आंबेडकरांनी शिक्षण हाच यांच्या सर्व दुखण्यावरील रामबाण उपाय आहे हे ओळखले होते. या संबंधी २८ फेब्रुवारी १९२० 'मूकनायका' संपादकीय मध्ये ते लिहितात,

'हे स्वराज्य नव्हे तर आमच्यावर राज्य' कारण भारतीय स्वातंत्र्य आंदोलन

LIBRARY

यावेळी वेगळया वळणावरती होते. म.गांधीच्याकडे स्वातंत्र्य आंदोलनाची धुरा होती. स्वराज्याची मागणी अत्यंत जोमाने मांडण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या विविध ठरावाद्वारे केला जात होता. " जेथे जेथे म्हणून स्वराज्य आहे तेथे तेथे प्रत्येक प्रजेला साक्षर करण्याच्या हेतूनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. आणि म्हणून हिंदी प्रजा साक्षर करणे असेल तर स्वराज्य मिळाल्या शिवाय गत्यंतर नाही " [१०] याचवेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्या कडे होते. पण काँग्रेसमध्ये काम करणाऱ्या राष्ट्रभक्तांनी आपल्या सर्व प्रजेला प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे. यासाठी प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसत नाही. कारण, १९१० साली कायदे कौन्सीलात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे बील आणले. यावेळी मा. ना. गोखले यांनी प्रामाणिक प्रयत्न केले पण त्याला दुजोरा देणारे जहाल राष्ट्रभक्त अप्रामाणिक होते. यातच पुणेकर मंडळी ही फार पिछाडीवरती होती. शिक्षण मुलींना मुलाबरोबर द्यावे की नंतर द्यावे याचाच वादविवाद करण्यात ते गुंतले होते. प्रथमतः सक्तीचे शिक्षण कशाला ? आहेत त्याच शाळा सुधारा, हवेशीर करा, त्यांना बागबगीचे जोडा, व्यायामाकरीता पटांगणे जोडा असा सल्ला टिळकांच्या केसरीने दिला " [११] याचा अर्थच असा होता की केसरीचे नेतृत्व करणारे लो. टिळक किंवा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मवाळ नेतृत्व या सर्वांनाच प्रस्थापित समाजव्यवस्थाच हवी होती. सुधारणा हव्या होत्या पण आपल्याच जातीतील लोकांच्या, प्रगती हवी होती मात्र स्वजनांचीच. ब्रिटीश गेले पाहिजेत असे वाटत होते, कारण देशाच्या सर्व सत्तेचे मालक बनण्यासाठी. याला छेद देण्याचा प्रयत्न डॉ.आंबेडकरांनी मूकनायकामधून दिला. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, शिक्षणामुळेच परिवर्तन होऊ शकते. यावरती अढळ विश्वास असल्याने डॉ.आंबेडकरांनी बहिष्कृत मुलांच्या शिक्षणासाठी विविध परिषदा मधून ठराव केले. २१ व २२ मार्च १९२० रोजी दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद कागल संस्थानमधील 'माणगांव' या ठिकाणी भरली होती. यामध्ये विविध ठराव मांडले गेले. त्यात शिक्षणा बाबतही ठराव मांडले व प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत

झाले पाहिजे असे स्पष्ट केले.

*ठराव* नं. ५. "प्राथमिक शिक्षण मुलामुलींचा भेद न करता जितक्या लवकर होईल तितक्या लवकर सक्तीचे व मोफत करण्यात यावे .

*ठराव* नं. ६. बहिष्कृत वर्गात शिक्षणाचा प्रसार होणे अत्यंत जरुरीचे आहे . त्या शिवाय त्यांची उन्नती होणार नाही म्हणून त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यास शाळा मास्तर डेप्यूटी असिस्टंट, डेप्यूटी एज्युकेशन इन्स्पेक्टर त्यांचे हितेच्छू असले पाहिजेत. तसेच बहिष्कृत वर्गाचे शिक्षक ट्रेंड होण्यास त्यांना विशेष सवलत द्यावी.

*ठराव* नं.७. ब्राह्मणेत्तर व बहिष्कृत वर्गाच्या विद्यार्थ्यांना मध्यम व वरिष्ठ शिक्षणार्थ शिष्यवृत्या मिळाव्यात .

*ठराव* नं. ८. सर्वत्र स्पृश्य व अस्पृश्यांच्या शाळा एकत्र असाव्यात. "[१२]

डॉ.आंबेडकरांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरवात जशी माणगांव मधून केली, तशीच शैक्षणिक कार्याची सुरूवात माणगांवमधूनच केली. हे तेथे मांडलेल्या ठरावावरून लक्षात येते. सरकारने शिक्षणाची सद्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी व त्यावर उपाय योजना सुचविण्यासाठी सर चंदावरकर कमिटी १९२१ साली नेमली.

## ३.२ चंदावरकर समितीच्या शिफारसी (१९२१)

१९२१ साली सर नारायणराव चंदावरकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणाच्या प्रगती संबंधी आढावा घेण्यासाठी समिती नेमली. या समितीने शिक्षणविषयक कांही शिफारसी केल्या, त्या पुढील प्रमाणे.

१) दहा वर्षाचा शिक्षणाचा कार्यक्रम आखून तो अंमलात आणल्यास १ कोटी १० लाख रुपये पर्यंत वार्षिक खर्च करावा लागेल असा अंदाज व्यक्त केला .

२) या रकमेपैकी ७७ लाख रुपये सरकाराने द्यावेत.

३) शिक्षणाच्या सक्तीचे तत्व अंमलात आणलेस १ कोटी ८३ लाख जादा खर्च करावा लागेल पैकी १ कोटी २१ लाख सरकारला द्यावे लागतील.

४) सक्तीच्या शिक्षणासाठी जिल्हा लोकल बोर्डाच्या खर्चाच्या बाबतीत २/३ भाग आणि म्युनिसिपालिटच्या बाबतीत १/२ खर्च सरकारने सोसावा .

५) शिक्षणावरती होणाऱ्या जादा खर्चासाठी लोकांवर कर बसवावे लागतील,

अशा अनेक चांगल्या शिफारशी चंदावरकर समितीने सरकारला सुचविल्या. त्या जर अंमलांत आणल्या असत्या तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणामध्ये पुष्कळ प्रगती दिसून आली असती.

१९२३ हे वर्ष मुंबई प्रांताच्या शैक्षणिक इतिहासात महत्वपूर्ण वर्ष मानले जाते. याच वर्षी प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी प्रांतिक शासनाने स्वत:कडून स्थानिक स्वराज्य संस्थाकडे हस्तांतरीत केली .

*तक्ता नं. २*

*१९२३ सालची मुंबई प्रांतातील लोकसंख्या व शिक्षणाचे प्रमाण* [११]

| मुंबई प्रांतातील लोकसंख्येचे वर्गीकरण | लोकसंख्येच्या दृष्टीने जाती जमातीचा क्रम | शैक्षणिक स्थिती | | |
|---|---|---|---|---|
| | | प्राथ.शि. | माध्य.शि. | उच्चशिक्षण |
| पुढारलेले हिंदू | चतुर्थ | प्रथम | प्रथम | प्रथम |
| मध्यम जातीचे हिंदू | प्रथम | तृतीय | तृतीय | तृतीय |
| दलित | द्वितीय | चतुर्थ | चतुर्थ | चतुर्थ |
| मुस्लीम | तृतीय | द्वितीय | द्वितीय | द्वितीय |

या आकडेवारीवरुन लक्षात येते की, दलित वर्ग लोकसंख्येच्या दृष्टीने मुंबई प्रांतात द्वितीय आहे तर प्राथमिक शिक्षण, माध्यमिक आणि उच्च शिक्षणामध्ये तो चतुर्थ आहे पुढारलेले हिंदू म्हणजेच उच्चवर्णिय, लोकसंख्येने चतुर्थ असून सर्व प्रकारच्या शिक्षणात ते प्रथम आहेत.हे विदारक चित्र डॉ.आंबेडकरांनी कमिटीला दाखवून दिले.

मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणाबाबत सरकार नैराश्य दाखवत असल्याचे आकडेवारीने जरी सिध्द करून सुध्दा यामध्ये फार मोठी सुधारणा झाली नाही. यासाठी स्वत:ची अशी शिक्षणविषयक काम करणारी संस्था स्थापण्याचा निर्णय घेतला व तो अंमलात आणला.

## ३.३ बहिष्कृत हितकारिणी सभा ( २० जुलै १९२४)

उच्च शिक्षण घेत असतानाच भारतातील मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणाबाबत त्यांना चिंता वाटत होती. शिक्षण ही बाब सार्वत्रिक करुन सोपीव खात्याकडे वर्ग केली. आणि शिक्षणावर कराव्या लागणाऱ्या खर्चासाठी काढता पाया घेतला. स्थानिक संस्थांच्या कडे शिक्षण वर्ग केले असले तरी सामान्य गरीब लोकांना शिक्षण देण्यासाठीचे ज्ञान, कुवत स्थानिक संस्थाच्या पदाधिकाऱ्यांकडे नव्हते याची जाणीव डॉ.आंबेडकरांना होती. म्हणून त्यांनी स्वत:ची अशी शिक्षणाबाबत कार्य करण्यासाठी बहिष्कृत हितकारिणी सभा २० जुलै १९२४ रोजी स्थापन केली. या सभेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते, सेक्रेटरी सी. ना. शिवतरकर तर खजिनदार निवृत्ती तुळशीराम जाधव होते. [१४]

संस्थेचे उद्देश व करावयाची कामे यामध्ये खास करुन शिक्षण प्रसार करणे , वाचनालये स्थापने, वसतिगृहे काढणे इ. कामे होती. मात्र आपल्या संस्थेमार्फत वसतिगृहे उघडण्याचे काम चालू असतानाच देशाच्या राजकारणात त्यांनी कटाक्षाने लक्ष ठेवले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि ते मोफत मिळण्यासाठी त्यांनी आग्रह सोडला नाही.

प्राथमिक शिक्षणाची सक्ती आणि ते मोफत मिळाले पाहिजे हे सांगत असतानाच त्यांनी याकडे सरकारचे लक्ष नाही असे स्पष्ट मत मांडले. १२मार्च १९२७ रोजी मुंबई विधान मंडळामध्ये शिक्षण अनुदान विधेयक मांडले गेले. त्या चर्चेत आपले मत मांडताना डॉ.आंबेडकर म्हणाले प्राथमिक शिक्षण हे सक्तिचे झाले पाहिजे. सामान्य जनतेला नैतिक व सामाजिक उन्नतीसाठी योग्य ते शिक्षण देणे हा शिक्षण खात्याचा उद्देश असला पाहिजे असे ते सांगतात. हे सांगतानाच सरकारचे याकडे किती दुर्लक्ष आहे हे दाखवून

देताना ते म्हणतात, 'सध्या आपण जो प्राथमिक शिक्षणावरीत खर्च करीत आहोत. तो सर्व खर्च व्यर्थ जातो आहे. कारण प्राथमिक शाळेत प्रवेश घेतलेल्या १०० मुलांपैकी फक्त १८ मुले चवथ्या वर्गात जातात. ऊरलेली ८२ मुले निरक्षरतेच्या गर्तेत जातात. प्राथमिक शिक्षणावरती अधिक खर्च शक्य नसेल तर निदान झालेल्या खर्चातून कांही फलनिष्पती व्हावी म्हणून तरी अतिरिक्त खर्च केला जाणे आवश्यक आहे.'[१५] शिक्षणातील ही विषमता मागासवर्गीयांच्या मागासलेपणाचे महत्वाचे कारण आहे हे त्यांनी दाखवून दिले.

## ३.४ शैक्षणिक विषमता

भारतीय समाजाची रचनाच विषमतेवरती आधारित आहे. अस्पृश्य किंवा बहिष्कृत या वर्गाच्या पदरी तर लाचारीचे जिणे होते. शिक्षणाचा हक्क या व्यवस्थेने बहिष्कृतांना नाकारला होता. १९२७ पर्यंत प्राथमिक शिक्षणातील विषमता प्रकर्षाने जाणवते. विविध जाती जमातींच्या लोकसंख्येच्या दृष्टीने शिक्षणातील प्रमाण हे असमान, अन्याय करणारे होते. प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील मागासवर्गीय जातीजमातींचे विद्यार्थी १००० लोकसंख्येमध्ये १८ विद्यार्थी होते.

*तक्ता नं. ३*

*प्राथमिक शिक्षणाचे दर हजारी लोकसंख्येशी प्रमाण* [१६]

| वर्ग | १००० लोकसंख्या | प्रमाण |
|---|---|---|
| ब्राह्मण व तत्सम जाती | -----"------ | ११९ |
| मुसलमान | -----"------ | ९२ |
| मराठी व तत्सम जाती | -----"------ | ३८ |
| अस्पृश्य व तत्सम जाती | -----"------ | ३८ |

(पहा परिशिष्ट १) डॉ.आंबेडकर या विषमता दर्शक प्रमाणाबाबत म्हणतात,

शिक्षणाच्या शर्यतीत धावणाऱ्या या घोड्यात एवढे अंतर पडले आहे की पहिल्यास

शेवटचा दिसत नाही. शेवटच्यास पहिला दिसत नाही. मागासलेला वर्ग गाढ निद्रेत घोरत पडत असलेल्या वर्गाने खडबडून जागे व्हावे व घोडदौड करुन सर्वांना मागे टाकावे हा आश्चर्यकारक परिणाम कसा घडेल. हा प्रश्न विचारात घेण्यासारखा आहे.[१७] १८८२ पासून १९२८ पर्यंतच्या कालावधीचा लोकसंख्येच्या तुलनेत दलित किंवा अस्पृश्य किंवा बहिष्कृतांचे प्राथमिक शिक्षणातील प्रमाण लोकसंख्येच्या दृष्टीने द्वितीय तर प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत चतुर्थ होते. १८५४ पर्यंत दलितासाठी स्वतंत्र शाळा नव्हती. १८५५ मध्ये अहमदनगर येथे दलितांसाठी शाळा स्थापन करण्याचा शासनाने हा पहिला निर्णय घेतला. पेशव्यांच्या राजवटीत तर दलितांना शिक्षण पूर्णपणे वर्ज्यच होते. ब्रिटिशांनीही फार मोठे प्रयत्न करुन दलितांना शिक्षण दिले असेही नाही. कारण ते अभिजन वर्गाला नाराज करु इच्छित नव्हते. त्यामुळे कमालीची शैक्षणिक विषमता निर्माण झाली होती.म्हणजेच बहुसंख्य ब्राह्मणेत्तरांना शिक्षण नाही व अल्पसंख्य उच्च जातींना शिक्षण ही परिस्थिती तत्कालीन भारतात होती.

## ३.५ विशेष सलवतींची आवश्यकता

मागावर्गीयांना शिक्षणापासून जाणीवपूर्वक लांब ठेवले होते. पेशव्यांच्या काळात हा अधिकार मुळीच नव्हता. संपुर्ण राज्य व्यवस्थाच मनूस्मृतींवरती आधारीत होती. राज्यव्यवस्थेला धर्माचे अधिष्ठान होते. या सनातनी विचारधारेमुळे शैक्षणिक क्षेत्रात कमालीची विषमता निर्माण झाली होती. मागासवर्गीयांना शिक्षण दिले पाहिजे व त्याचबरोबर त्यांना इतर समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी विशेष दर्जा व सवलतींची आवश्यकता आहे हा विचार म.फुले शाहू महाराज यांच्यानंतर भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. मुंबई विधान मंडळातील शिक्षण अनुदान विधेयकावरती सन १२ मार्च १९२७ रोजी चर्चा करताना डॉ. आंबेडकर म्हणतात,

हिंदुस्थान हा विविध जाती जमातींचा देश आहे आणि या सर्व जाती जमाती सामाजिक दर्जा व आर्थिक स्थिती याबाबतीत असमान आहेत. या सर्व जाती जमातींना

14773
A

समान स्तरावरती आणावयाचे असेल तर असमान वर्तणूकीच्या तत्वाचा स्विकार करुन काही वर्गास विशेष सवलत देणे आवश्यक आहे. जे निम्न स्तरावरती आहेत त्यांना विशेष दर्जा व सवलत देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आणि मागासवर्गीयांच्या शिक्षणाची हेळसांड होऊ नये यासाठी स्वतंत्र निरीक्षण व पर्यवेक्षण यंत्रणा निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी शासनाने अंदाजपत्रकात तरतूद केली पाहिजे. असा त्यांना आग्रह होता. [१८]

## ३.६) लोकल बोर्ड आणि म्युनिसिपालट्या मधील प्राथमिक शिक्षणाबाबत डॉ.आंबेडकरांचे विचार

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्राथमिक शिक्षणावरती मदार होती. यासाठी वेगवेगळ्या प्रसंगी प्राथमिक शिक्षणाबाबत आपले मत व्यक्त करताना सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा आग्रह धरला होता. पण राज्यकर्ते तेवढ्या गांभीर्याने याकडे लक्ष देत नव्हते. १९२० साली झालेल्या कायद्याने मुंबई शहरातील प्राथमिक शिक्षण मुंबई म्युनिसिपालिटीच्या ताव्यात आले आणि १९२३ च्या कायद्याने जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण स्थानिक म्युनिसिपालिटी आणि लोकल बोर्ड कडे सुपुर्द केले. [१९] यावेळी डॉ. परांजपे शिक्षणमंत्री होते. प्राथमिक शिक्षणात लबाडी सांगताना डॉ.आंबेडकर म्हणतात, लोकलबोर्डे व म्युनिसिपालिट्या म्हणजे वर्णाश्रमवाद्यांच्या संस्था आहेत. त्यांच्यात भरणा होणार तो ब्राह्मण्यग्रस्त अज्ञान जनतेचाच होणार असे लोक अस्पृश्यांच्या शिक्षणाची काळजी घेतील हे कशावरून सांगता येईल. [२०] सरकारने शिक्षण खाते सोपीव खात्याकडे सुपूर्द करून लोकल बोर्ड व म्युनिसिपालिट्या कडे शिक्षणाचा भार सोपविला यामुळे अस्पृश्यांना शिक्षण मिळणे दुरापास्तच होते. डॉ.आंबेडकरांनी शिक्षण अनुदान विधेयकावरती चर्चा करताना असा कायदा करणे किती चूक आहे हे सांगताना ते म्हणतात,

''या कायद्यान्वये शिक्षणाची जबाबदारी अशा लोकांच्या स्वाधीन करण्यात आली की ते पुरसे सुबुद्ध नाहीत आणि त्यांना शिक्षणाच्या महत्वाची जाणीवही नाही.

स्थानिक संस्थांचे सभासद बहुतांश अशिक्षित असल्याने त्यांना शिक्षणाचे महत्व कळण्याचा प्रश्नच येत नाही. म्हणून या सभागृहाने शिक्षणाचा कायदा करुन ज्यांना त्याविषयी कोणतीही जाण नाही आणि आस्थाही नाही अशांच्या हाती सोपवून फार मोठी चूक केली आहे. ज्यांना ही जबाबदारी पेलणे शक्यच नाही. अशा स्थानिक संस्थांच्या खांद्यावर ही जबाबदारी टाकली आहे. यामुळे शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसाराला अनिश्चित काळापर्यंत पायबंद घातला आहे. यामुळे सर्वात जास्त हानी अस्पश्यांनी होणार आहे. "

कारण प्रत्येक स्थानिक संस्थेच्या एकूण सभासदापैकी १ सभासद हा मागासवर्गीय आहे. हा एकमेव प्रतिनिधी या संस्थात राहून काहीही विधायक काम करु शकणार नव्हता. कारण इतर सभासदांच्या तुलनेत त्याच्या मताला किंमत नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या विचारातून अस्पृश्यांना स्थानिक संस्थांचे प्रशासन दिले आहे. पण त्यातून मागावर्गीयांच्या शिक्षणाला कोणतीच चालना मिळणार नाही हे दाखवून दिले आहे.त्यामुळे स्थानिक संस्था यांचे प्रतिनिधी व सरकारचे धोरण तसेच राखीव खाती हाती असलेल्या मंत्र्यावरही टीका केली आहे.कारण ते सर्व वरिष्ठ वर्गाचेच प्रतिनिधी होते.

थोडक्यात मागासवर्गीयांच्या धोरणाविरुद्ध तयार केलेले कायदे बदलले पाहिजेत हा पवित्रा पारतंत्र्यातील भारतात म.फुलेंच्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेला दिसतो. या संबंधात ६ मे १९२९ रोजी मुंबई सरकारचे शिक्षणमंत्री ना.मौलवी रफिउद्दिन अहमद यांच्या उपस्थितीमध्ये महाबळेश्वर येथे प्राथमिक शिक्षणाची प्रगती झपाट्याने कशी करता येईल याचा विचार करण्यासाठी भरलेल्या परिषदेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,

'प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार,सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुषीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील" [२२] म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डस् यांच्यावरती

शिक्षणाची जबाबदारी सरकारने टाकली, परंतु त्याची अंमलबजावणी मुंगीच्या पावलांनी होत आहे. या कायद्याचे विदारक चित्र डॉ. आंबडेकरांनी आकडेवारीने सिद्ध केले . १९२०-२१ साली मुलामुलींच्या प्राथमिक शाळांची एकंदर संख्या १३,००० पेक्षा कमी होती व विद्यार्थ्यांची संख्या ८ लाख १ हजार इतकी होती. १९२६-२७ मध्ये शाळांची संख्या १३८३५ आणि विद्यार्थी १० लाखाच्या जवळपास आणि १९२०-२१ साली शिक्षणावरील खर्च १कोटी २७ लाख तर १९२६-२७ मध्ये १ कोटी ९८ लाख [२३] सहा-सात वर्षात फक्त ८३५ शाळा वाढल्या आणि २ लाख विद्यार्थी या आकडेवारी वरून सरकार व स्थानिक संस्था शिक्षणाबाबतीत किती निष्काळजी होत्या हे लक्षात येते. डॉ.आंबेडकर सरकारी धोरणावरती टीका करुन थांबत नाहीत तर १९२० ते १९२७ या कालखंडातील आकडेवारी व मागासवर्गीचे शिक्षण याचा आलेखच ते राज्यकर्त्यांपुढे ठेवतात व म.गांधींचे लक्ष हरिजन व त्यांचे प्रश्न काय आहेत याकडे वळविण्यास डॉ.आंबेडकर यशस्वी झालेले दिसतात. म्हणूनच राष्ट्रीय काँग्रेस हळूहळू या विधायक कार्याकडे व सामाजिक प्रश्नाकडे वळलेली दिसते. 'हरिजन' वृत्तपत्राची सुरूवात हे याचे लहानसे उदाहरण आहे. ज्यातून म.गांधींनी या समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक प्रगतीविषयी आपली मते मांडलेली दिसतात.

## ३.७ कायदा मूलतः सदोष

प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक संस्थांच्याकडे देणारा कायदा हाच मूळ सदोष कसा आहे हे सांगताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२१ साली आलेल्या चंदावरकर कमिटी रिपोर्टातील शिफारशी अंमलात येवू शकल्या असत्या तर प्राथमिक शिक्षणामध्ये बरीच प्रगती दिसून आली असती असे ते म्हणतात. या सक्तीच्या शिक्षणाप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाचा जिल्हा लोकल बोर्डाच्या बाबतीत २/३ भाग, व म्युनिसिपालिटींच्या बाबतीत १/२ भाग सोसण्याची जबाबदारी कायद्याने सरकारवरती टाकलेली असताना सरकारने हा निधी या संस्थांना पुरवला नाही. सरकारच्या जादा निधीच्या उपलब्धतेसाठी

कोणत्या प्रकारचे कर द्यावेत हे सुद्धा कमिटीत सुचविले होते पण याकडेही सरकारने डोळेझाक केली आहे.

म. फुलेंनी १८८२ साली हंटर आयोगापुढे साक्ष देताना प्रथमत: शिक्षणाबद्दलची गरज त्याबाबतचे गांभीर्य सरकारच्या लक्षात आणून दिले होते आणि प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत का पाहिजे याचा खुलासा केला होता पण विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचा कायदा झाला पण तोही अनंत दोष असणाराच होता. या कायद्याबाबत बोलताना डॉ.आंबेडकर म्हणतात,

"आमच्या मते सक्तीच्या शिक्षणासंबंधाच्या प्रश्नांची मुख्य दोन अंगे आहेत ती १) शिक्षणावरील ताबा २) सक्तीचे तत्व अंमलात आणण्याची जबाबदारी. या दोन्ही बाबतीत सध्याच्या प्राथमिक शिक्षणासंबंधाचा कायदा मूलत: सदोष आहे. शिक्षण ही बाब सध्याच्या परिस्थितीत तरी स्थानिक स्वराज्याच्या मर्यादेत येणे ईष्ट नाही. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डस यांच्यात सध्या जी माणसे निवडून येतात त्यातील पुष्कळशी माणसे शिक्षणावरती ताबा ठेवणेस अपात्र असतात. कित्येकांना शिक्षणाचे ध्येय व पद्धती यांची अंधुक कल्पनाही नसते. त्याशिवाय जातीभेद व पक्षभेद यांच्यामुळे सभासदांमध्ये चूरस असते. त्याचा परिणामा शाळांच्या व्यवस्थेवरती झाल्याशिवाय राहार नाही याचा परिणामही मागावर्गीयांच्या शिक्षणावरती प्रतिकूल होत आहे.

यासाठी शिक्षणावरती प्रांतीक सरकारचाच ताबा असणे इष्ट व आवश्यक आहे. शिक्षण ही बाब रस्तेबांधणे, गटारे साफ ठेवणे वगैर बाबीपेक्षा निराळी आहे. बारभाईचा कारभार तथे उपयोगी नाहा[३४] सरकारने चुकीचा कायदा करून मागासवर्गीयांच्या शिक्षणाची घोर निराशाच केली होती. सरकारने शिक्षणापासून हात झटकणे चूकीचे होते. कारण प्रांतीक सरकार शिक्षणाप्रित्यर्थ ८० टक्के पेक्षा अधिक खर्च करणार व १५ ते २० टक्के खर्च स्थानिक संस्था जर करणार असतील तर प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याची जबाबदारी सरकारवरच येते म्हणून हा कायदा सदोष आहे.

१९२१ साली शिक्षण सुधारणा कायदा लागू करणेत आला. शिक्षण खात्याचा कारभार स्वतंत्रपणे एका मंत्र्याकडे सुपुर्द करण्यात आला. मंत्र्याच्या हाती शिक्षणाचा कारभार सोपविल्यानंतर शिक्षणाचा जलद गतीने प्रसार होईल अशी अपेक्षा होती पण ही अपेक्षा फोल ठरली. या कायद्याने दलितांना खऱ्या अर्थाने अंधार कोठडीतून नरकात टाकले. या संबंधात बहिष्कृत हितकारिणी सभेच्या वतीने २९ मे १९२८ रोजी मुंबई प्रेसीडेंसीमधील दलित वर्गाच्या अशैक्षणिक अवस्थेविषयी डॉ.आंबडेकरांनी भारतीय संवैधानिक आयोगास निवेदन केले. यामध्ये त्यांनी १८५३ पासून १९२८ पर्यंतच दलितांच्या शिक्षणाचा आढावा घेतला यामध्ये १९२३ पासून पुढे झालेल्या शैक्षणिक बदलांबाबत डॉ. आंबडकरांनी अत्यंत चिंता व्यक्त केली आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचा कायदा दलितांची घोर निराशा करणारा ठरला. याबाबत त्यांनी दलितांना खऱ्या अर्थाने शिक्षण मिळावे अशी सरकारची अपेक्षा असेल तर खालील मतांचा विचार करावा व उपाययोजना कराव्यात.

१) जो पर्यंत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा व शिक्षण कारभाराचे शाळा बोर्डांना केलेले हस्तांतर रद्द होत नाही तो पर्यंत दलितांची होणारी हानी थांबविता येणार नाही.

२) प्राथमिक शिक्षणाची सक्ती बंधनकारक व प्राथमिक शाळांत प्रवेशाच्या कायद्याचे सक्तीने पालन केल्याशिवाय दलितांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी अनुकूल परिस्थिती कधीही अस्तित्वात येणार नाही.

३) शिक्षणाविषयी आकर्षण निर्माण व्हावे प्रोत्साहन मिळावे यासाठी दलित समाजाला शासनसेवेत राखीव जागा दिल्या जातात.[२५]

प्राथमिक शिक्षणाबद्दलची दलितांची स्थिती अत्यंत विदारक असल्याने डॉ.आंबडेकर म्हणतात, आधी दारुबंधी की आधी सार्वत्रिक शिक्षण' असा सवाल आम्हाला कोणी विचारला तर 'आधी सार्वत्रिक शिक्षण असाच आम्ही जबाब देऊ. शिक्षण प्रसार सार्वत्रिक

झाल्यास दारुबंदीला आळा घालणे सोपे जाईल. इतकेच नव्हे तर दारुबंदी संबंधी लोकांची मागणी विशेष नेटाने पुढे येईल. [२६] यासाठी प्राथमिक शिक्षणावरती डॉ.आंबडकरांनी भर दिलेला आहे व त्यासंबंधी झालेला कायदा किती सदोष आहे हे सिद्ध केले.

## ३.८ अस्पृश्य शाळेतील विद्यार्थ्यांची स्थिती

परंपरेने अस्पृश्यांना शिक्षणाचे हक्क आणि अधिकार नाकारलेले होते. म.फुले, छ.शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे मागावर्गीय समाजाला आणि विशेष करुन अस्पृश्यांना शाळेत प्रवेश देण्यासंबंधी कायदे केले गेले.त्यामुळे अस्पृश्यांना शिक्षण मिळाले. पण त्यांची शाळेतील अवस्था अत्यंत विदारक होती. मानवी हक्काची पायमल्ली करणारी होती.

३० मे १९२९ च्या बहिष्कृत भारताच्या पुरवणीमध्ये डॉ.आंबेडकरांनी नाशिक जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधून अस्पृश्य मानलेल्या विद्यार्थ्यांची शिक्षणाबाबत गैरसोय कशी होती आणि त्यांना शाळेबाहेर बसावे लागते हा गैरसोय दाखविणारा तक्ताच दिला आहे. यामध्ये ते सांगतात, मालेगाव शहरात उमराणी व चिंच गव्हाण येथे अस्पृश्य मुलांना शाळेबाहेर बसाबे लागे. येवले शहरात मुखेड, पारदगाव, सिरसगाव, बाळापूर येथे वर्गातच पण थोड्या अंतरावर बसाबे लागे. देशमाने या गावात मारुतीच्या देवळात शाळा भरते पण अस्पृश्यांच्या मुलांना गावकरी बसू देत नाहीत. निमगाव येथे शाळेबाहेरील पडवी मध्ये अस्पृश्य मुलांना बसाबे लागे. नाशिक, निफाड, इगतपुरी, दिंडोरी बागलाण, कळवण आणि सिन्नर या ठिकाणी अस्पृश्य मुलांची अवस्था काही वेगळी नव्हती [२७] यावरुन डॉ.एक गोष्ट लक्षात येते डॉ.आंबेडकरांच्या सारख्या अस्पृश्यासाठी अहोरात्र प्रयत्न करुनही अस्पृश्यांची ही स्थिती तर १९२० पूर्वी काय अवस्था असेल ?

## ४. माध्यमिक शिक्षणा बाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार

मागासवर्गीय लोकांना घटनात्मक आणि कायदे बनविण्याचे अधिकार प्राप्त करुन देण्याच्या कार्यात आंबेडकरांच्या प्रयत्नांचा उत्साहाचा आणि बुध्दीचा बराच भाग

खर्च होत होता तरी सुध्दा आपले लोक शिक्षणात मागासलेले असल्यामुळे शिक्षण हीच आपल्या लोकांची मोठी गरज आहे. शिक्षण हेच प्रगतीचे प्रभावी साधन आहे ही जाणीव त्यांच्या मध्ये नेहमी जागृत होती. त्यांनी " बहिष्कृत हितकारिणी सभा १४ जून १९२८ रोजी विसर्जित करण्याचा ठराव केला आणि बहिष्कृत वर्गात शिक्षण प्रसार करणेसाठी 'भारतीय बहिष्कृत समाज शिक्षण प्रसारक मंडळ' काढण्याचे ठरले. अस्पृश्य समाजातील लोकांना आपल्या मुलांच्या माध्यमिक शिक्षणावरती होणारा खर्च झेपण्यासारखा नव्हता. त्या मुलांची सोय व्हावी म्हणून दलित वर्ग शिक्षण संस्थेने छात्रालये उघडण्याचे कार्य हाती घेतले आणि या कार्यासंबंधी आंबेडकरांनी सरकारला साहय करण्याविषयी कळकळीचे आवाहन केले .[२८] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणाबरोबर माध्यमिक शिक्षण बाबतही प्रयत्न आणि कामे केलेली आहेत. त्यांच्या आवाहनाला राज्यपालांनी दाद दिली त्यानुसार सरकारने ८ ऑक्टोबर १९२८ रोजी एक योजना समंत केली. त्यानुसार माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या केवळ अस्पृश्य वर्गीय मुलांच्या उपयोगाकरिता पाच छात्रालयाच्या योजनेस आपण मान्यता देवू अशी राज्यपालानी घोषणा केली. [२९] धनंजय कीर एके ठिकाणी म्हणतात ,

आंबेडकरांना खचितच माहीत होते की, आपल्या लोकांना राजकीय दृष्ट्या समानता आणि राजकीय क्षेत्रात सामर्थ्य ही प्राप्त करुन दिल्यास त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न आपोआप सरकारी खात्याच्या वतीने सोडवला जाईल असे त्यांना वाटत होते म्हणून त्यांनी आपला वेळ, बुध्दीही अस्पृश्यांची शैक्षणिक प्रगती करुन घेण्यापेक्षा त्यांना राजकीय हक्क प्राप्त करुन देण्याच्या कामी लावली [३०] पण धनंजय कीर यांचे हे मत फारसे बरोबर आहे असे वाटत नाही. कारण डॉ. आंबेडकरांनी राजकारणाकडे जितक्या बारकाईने पाहिले तितक्याच बारकाईने अस्पृश्यांच्या शिक्षणाकडे पाहिलेले आहे. राजकारणातून मिळणाऱ्या सोयी सवलतींच्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे, हे डॉ.आंबेडकरांना चांगले माहीत होते. म्हणूनच विद्यार्थी दिशेत सुध्दा शिक्षणाबाबत त्यांची मते किती महत्वपूर्ण आहेत.

हे त्यांनी १९१३ पाठविलेल्या पत्रावरुन लक्षात येते. त्याच बरोबर राजकीय दृष्ट्या समानता अस्पृश्यांना मिळण्यासाठी त्यांनी जे जे प्रयत्न केले त्याबरोबरच शिक्षणासंबंधी शिक्षण अनुदान विधेयका वरील चर्चा, विविध परिषदामधील त्यांची भाषणे, ठराव, भारतीय संवैधानिक आयोगापुढील कैफियत, यासारखी कितीतरी कामे अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी केली याचाच अर्थ डॉ.आंबेडकरांनी सर्व समस्यांचे मूळच शिक्षण नसणे म्हणून अस्पृश्यांना मिळाले पाहिजे यासाठी राजकीय सुधारावरोबर शिक्षणातील प्रगतीबाबत ही डॉ. आंबेडकर तितकेच जागृत होते हे स्पष्ट आहे.

मुंबई विधान मंडळामध्ये शिक्षण अनुदान विधेयकावरती चर्चा करताना डॉ. आंबेडकरांनी सरकारवरती ताशेरे ओढले "मुलांच्या प्राथमिक आणि दुय्यम किंवा माध्यमिक शिक्षणाच्या उन्नतीसाठीची प्रगती अत्यंत दुय्यम गतीने होत आहे. आपली प्रगती याच गतीने राहिली. मुलांच्या मध्ये शिक्षणाबाबत अनास्था निर्माण होईल या बाबीची गंभीरपणे दखल घेणे आवश्यक आहे.[३१] डॉ.आंबेडकरांनी आकडेवारी सांगून माध्यमिक शिक्षणाची दुरावस्था स्पष्ट केली आहे.

*तक्ता नं. ४*

*माध्यमिक शिक्षणाचे दर १लाख लोकसंख्येशी जातनिहाय प्रमाण* [३२]

| | | |
|---|---|---|
| उच्चवर्गीय हिंदू | १ लाख लोकसंख्या | १००० विद्यार्थी |
| मुस्लीम | १ लाख लोकसंख्या | ५०० विद्यार्थी |
| ब्राम्हणेत्तर मुस्लीम जाती | १ लाख लोकसंख्या | १४० विद्यार्थी |
| मागासवर्गीय जाती जमाती | १ लाख लोकसंख्या | १४ विद्यार्थी |

प्राथमिक शिक्षणामध्ये १ लाख लोकसंख्येला मागासवर्गीय जाती जमातीची संख्या १८ तर माध्यमिक शिक्षणामध्ये १ लाख लोकसंख्येला विद्यार्थी संख्या १४ अशी आहे.याचा अर्थ प्राथमिक शिक्षणातून पुढे माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीची संख्या घटतांना दिसते. पुढे उच्च शिक्षणात ही संख्या २ लाख लोकसंख्येमध्ये शून्य किंवा

चुकून एखादा अशी विदारक स्थिती माध्यमिक शिक्षणाची आहे याचे महत्वाचे कारण पुढील शिक्षणासाठी खर्चाची सोय घरी नसल्यामुळे मुलांचे प्राथमिक शाळेत येण्याचे प्रमाण फार आहे आणि दुसरे असे की मुलांना शाळेत घालण्याची जरी आई वडिलांची इच्छा असली तरी ती सहज सफल होत नाही, कारण मुलाला शाळेत घातले तर त्याचा दुहेरी बोजा आईबापावरती पडतो एक तर मुलगा शाळेत गेला तर त्याच्यापासून होणारी कमाई बंद होते व तो आई बापाच्या अंगावरती बोजा पडतो. दुसरे त्याच्या शिक्षणासाठी होणारा खर्च त्याच्या आईबापास सहन करावा लागतो म्हणजे शिक्षणामुळे मुलांकडून मिळणारी आयती कमाई बंद होवून नुकसानच आहे , म्हणून मागासवर्गीयांच्या पिढ्यानपिढ्या अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या दिसतात यासाठी डॉ. आंबेडकर म्हणतात माध्यमिक शिक्षणावरती होणारा खर्चापैकी ३१ टक्के खर्च फी द्वारा वसूल केला जातो. आहे तेव्हा हा शिक्षणाचा व्यापार थांबावा कारण नुकतेच कोठे समाजाच्या निम्न स्तरावरील विद्यार्थी माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळात आणि महाविद्यालयात प्रवेश घेत आहेत. यासाठी शिक्षण कमीत कमी खर्चात कसे होईल असे धोरण शिक्षण खात्याने आखणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे . [३३] डॉ.आंबेडकरांना असे वाटे की, जर माध्यमिक शिक्षणावरील खर्च कमी झाला तरच मागासवर्गीय लोक शिक्षण घेण्याचा प्रयत्न करतील.अन्यथा त्यांचे शिक्षण ही अशक्य गोष्ट आहे.

## ५. उच्च शिक्षणाबाबतचे विचार

प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षणाची जशी दलित समाजाला निकडीची गरज आहे, त्याचप्रमाणे या समाजाला उच्च शिक्षणाचीही तेवढ्याच निकडीने आवश्यकता आहे असे विविध भाषणातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांगत होते.

शिक्षण स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती आहे असे त्यांना वाटत होते, यासंबंधात ते म्हणतात,

“हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्व

आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानन्यात येते, पण ही मोठी चूक आहे. हिंदूस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करुन पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्चवर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्यांच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाज पध्दतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्यांचे त्यांच्या स्वत:च्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्व आहे याची त्यांना जाणीव करुन देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे . उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे." [३४] उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हतबल होऊन अल्पायुषी होतो तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो, यासाठी शिक्षणाची गरज आहे असे आंबेडकरांना वाटत होते. भारतीय संवैधानिक आयोगापुढे मुंबई प्रेसिडेंसीमधील दलित वर्गाच्या शैक्षणिक अवस्थेविषयी निवेदन करताना १८५४ पासून १९२८ पर्यंतचा आढावा घेताना उच्चशिक्षणाबाबतची आकडेवारी दिली आहे.

*तक्ता नं. ६*

**" महाविद्यालयीन शिक्षणाची स्थिती - १८८१-८२"** [३५]

| वर्ग | एकूण विद्यार्थी | शेकडा प्रभाव |
|---|---|---|
| ख्रिश्चन | १४ | ३ टक्के |
| ब्राम्हण | २४१ | ५० टक्के |
| इतर हिंदू कृषक | ५ | १ टक्के |
| कनिष्ठ जाती | ० | ० टक्के |
| इतरजाती | १०३ | २१.३ टक्के |
| मुस्लीम | ७ | १.५ टक्के |
| पारशी | १०८ | २१.५ टक्के |
| आदिवासी व पर्वतीय जमाती | ० | ० टक्के |
| ज्यू सहित इतर | २ | ०.४ टक्के |

...RSITY LIBRARY ...HAPUR

तक्ता नं. ६

## उच्च शिक्षणाची स्थिती १९२३ -२४ [३६]

| लोकसंख्येची वर्गवारी | उच्च शिक्षणात दर २ लाख विद्यार्थ्यांत या जातीचे विद्यार्थी |
|---|---|
| १) पुढारलेले हिंदू | १००० |
| २) मुस्लीम | ५२ |
| ३) मध्यम जाती | १४ |
| ४) दलित | ० (किंवा चुकून एखादा) |

(संदर्भ - संचालक जनसूचना खाते मुंबई प्रांत यानी दिलेले आकडेवारी)

१८८१-८२ च्या तुलनेत १९२३-२४ साली दलितांच्या उच्चशिक्षणांच्या स्थितीत कोणतीही प्रगती झालेली दिसत नाही. हे डॉ. आंबेडकर दाखवून देतात. जवळजवळ ४०वर्षानंतर ही मागासवर्गीय तेथेच आहेत. ब्रिटीशांनी सार्वत्रिक शिक्षण दिले.पण पुढे उच्चवर्णीयच गेले.येथेच त्यांच्या सामाजिक व धार्मिक दास्यत्वाची मुळे आहेत.हे ते पटवून देतात.

### ५.९ शिक्षणाचे व्यापारीकरण

१२ मार्च १९२७ रोजी मुंबई विधान मंडळातील शिक्षण अनुदान विधेयकावरती चर्चा करताना दाखवून दिले की, कला शाखेच्या उच्चशिक्षणासाठी केल्या जाणाऱ्या एकूण खर्चापैकी ३६ टक्के खर्च शिक्षण शुल्क आकारुन केला जातो. अशा प्रकारे शुल्क आकारुन शिक्षणावर होणारा खर्च वसूल करणे म्हणजे शिक्षणाचे व्यापारीकरण होय. शिक्षण सर्वाना सहज उपलब्ध होणे आवश्यक आहे. शिक्षण खात्याचा कारभार उत्पन्न व खर्चाच्या ताळेबंदीच्या आधारावर चालविला जाऊ नये. प्रत्येक परिस्थितीत उपलब्ध सर्व मार्गांचा अवलंब करुन शिक्षण सर्व सामान्यांना सुलभ होईल असे प्रयत्न करणे आवश्यक आहे .[३७] शिक्षण शुल्क भरुन शिक्षण घेण्याची पात्रता मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये नसल्याने तो आपोआपच या उच्च शिक्षणापासून बाजूला फेकला जाईल.

## ६. विद्यापीठीय शिक्षण

मुंबई शासनाने मुंबई विद्यापीठ सुधारणा प्रश्नांचे अध्ययन करुन त्यावर अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठ सुधारसमिती स्थापन केली होती. या समितीत एकूण १३ सभासद होते. सर चिमणलाल एच सेटलवार हे या समितीचे अध्यक्ष होते. या समितीने एक प्रश्नावली केली होती. ही प्रश्नावली देशातील निवडक ३२१ व्यक्तींना त्यांचे विचार जाणून घेण्यासाठी पाठविली होती. या निवडक व्यक्तीपैकी डॉ. आंबेडकर एक होते . डॉ. आंबेडकरांनी खालील प्रश्नासंबंधी आपली मते परखडपणे मांडली,

१) विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय आणि कार्ये

२) वर्तमान विदयापीठ शिक्षण यंत्रणेतील उणीवा

३) विविध जाती जमातीत सांस्कृतिक आदानप्रदान व सलोख्याचे संबंध सुधारण्याबाबत विद्यापीठाची भूमिका

४) उच्चशिक्षण व संशोधन या क्षेत्रात विद्यापीठाचे योगदान

५) परीक्षानुर्ती विद्यापीठाला शिक्षगानुवर्ती विद्यापीठात कसे परिवर्तन करता येईल.

६) विद्यापीठ आणि समाज, विद्यापीठ व शासन यांचे परस्पर संबंध

७) विशिष्ट जाती जमातीत विद्यापीठ शिक्षणाच्या प्रसारासाठी उपाय योजना

डॉ.आंबेडकरांनी मिळालेल्या संधीचा उपयोग शासन व समाजाचे लक्ष मागास वर्गीय व दलित यांची शैक्षणिक स्थिती, व प्रगती बाबीकडे प्रकर्षाने वेधण्याकडे केला. विद्यापीठ शिक्षणासंबंधी आपले विचार मांडताना डॉ. आंबेडकरांनी मागासवर्गीय व दलित यांचे निर्णय प्रक्रियेत नीती, निर्धारनात भागीदारी याचा आवर्जून उल्लेख केला.

### सिनेट

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते " जो पर्यंत विद्यापीठाच्या सीनेटमध्ये मागासवर्गीय व दलित यांना प्रतिनिधीत्व मिळणार नाही तोपर्यंत संशोधन आणि उच्च शिक्षण या क्षेत्रात या वर्गाच्या हिताचे संरक्षण व संवर्धन होऊच शकणार नाही. "[३८] विधानमंडळातील

चर्चे प्रसंगी डॉ.आंबेडकरांनी असंदिग्ध पणे घोषित केले की सिनेटमध्ये प्रतिनिधीत्वाच्या प्रश्नावर कोणतीही तडजोड न स्विकारता आपले विरोधी मत नोंदवू. थोडक्यात डॉ. आंबेडकरांनी साक्षीदार म्हणून मागासवर्गीय आणि दलितांच्या शैक्षणिक समस्येविषयीची कैफीयतच मांडली आणि आपली भूमीका अत्यंत कार्यक्षमतेने व परिणामकारक रित्या बजावली. विद्यापीठाच्या विशिष्ट समाजाच्या भूमीकेबाबत डॉ.आंबेडकर म्हणतात ,

" मागासवर्गीय समाजात आणि विशेष करुन दलित वर्गात विद्यापीठ शिक्षणाच्या प्रचार प्रसारासाठी विद्यापीठाने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे " [३९]

डॉ. आंबेडकर म्हणतात " अनुसूचित जातीची स्थिती व दर्जा यात सुधारणा होण्यासाठी, त्यात परिवर्तनासाठी अनुसूचित जातीतील युवकांना मंत्रीपदाव्यतीरिक्त प्रशासकीय सेवेत प्रतिनिधीत्व प्राप्त होणे, त्यांनी प्रशासकीय उच्च पदे प्राप्त करणे आवश्यक आहे. प्रशासकीय उच्चपदे या मोक्याच्या जागा आहेत. ही पदे प्राप्त करुन राज्याच्या धोरणाला कारभाराला नवी दिशा दिली जाऊ शकते. ही उच्चपदे प्राप्त व्हावयाची असतील तर प्रथम आणि आवश्यक अट म्हणजे उच्चशिक्षण. ही पदे ज्यांनी उच्च शिक्षण घेतले आहे, त्यांच्याशिवाय इतरांना कधीही प्राप्त होऊ शकत नाही,. प्राप्त होणारच नाहीत [४०] मान्याच्या आणि मोक्याच्या जागा काबीज करण्यासाठी उच्चशिक्षणाची अत्यंत गरज आहे. हा महत्वाचा मंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला आहे व सरकारनेही मागास विद्यार्थ्यांसाठी विशेष लक्ष देण्याची गरज आहे असे सांगितले. वेगवेगळया प्रसंगी विद्यार्थ्यांना दिलेल्या संदेशातून ही त्यांनी उच्चशिक्षणाची गरज प्रकर्षाने मांडली आहे.

उच्च शिक्षणाशिवाय मान्याच्या जागा मिळणार नाहीत याची जाणीव असल्यामुळे पुढे मागासवर्गीय मुलांच्या उच्चशिक्षणासाठी १९४५ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन केली गेली. एखादा विचार सांगून ते शांत बसले नाहीत तर त्यासाठी त्यांनी कृती केली. या शिक्षण संस्थेत सर्वच वर्गातील विद्यार्थी गर्दी करु लागले व त्यांचे ध्येय काही अंशी का असेना पूर्णत्वाकडे गेले.

## ७. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विचार

२९ ऑक्टोबर १९४२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गव्हर्नर जनरल यांना एक मेमोरंडम सादर केले. हे निवेदन अनुसूचित जातीच्या तक्रारीबद्दल होते. यामधील शैक्षणिक समस्यांच्या बाबतीत डॉ. आंबेडकर सांगतात " अनुसूचित जातीची उच्चशिक्षणात कला आणि कायदा शाखातील प्रगती समाधानकारक आहे.विज्ञान आणि आभियांत्रिकी शाखातील प्रगती शून्य आहे तर विदेशी विद्यापीठातून उच्चशिक्षण हे अनुसूचित जातीच्या दृष्टीकोनातून दिवास्वप्रागत_आहे ते त्याचा स्वप्नातही विचार करु शकत नाही. कला आणि कायदा या शाखातील शिक्षणाचे अनुसूचीत जातीच्या दृष्टीकोनातून काहीही महत्व नाही ना या शिक्षणाचे महत्व अनुसूचीत जातीतील पदवीधारकांसाठी ना त्या जातीतील लोकांसाठी अनुसूचित जातीच्या दृष्टीने महत्वाचे आणि उपयोगी शिक्षण म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्च शिक्षण होय " डॉ.आंबेडकरांनी या शिक्षणाचे गांभिर्य सांगताना 'धनबाद' येथील भारतीय खाणीकर्म तंत्रशिक्षण शाळेचे उदाहरण दिलेले आहे. खाण अभियांत्रिकी आणि भूगर्भ शास्त्र क्षेत्रातील उच्चतंत्रशिक्षणाची शाळेत ९७ प्रशिक्षणार्थी आहेत पैकी एकही अनुसूचित जातीचा नाही. यासाठी या शाळामध्ये अनुसूचित जातीच्या प्रवेशासाठी विशेष प्रावधाने करण्याची नितांत आवश्यकता आहे. यावरती त्यांनी भर दिला.

### ७.१ तंत्रशिक्षण प्रशिक्षणासाठी सवलतींची गरज

१) विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या शिक्षणात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता असलेल्या विद्यार्थ्यांना काही जागा आरक्षित करणे.

२) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणशुल्क माफीची सवलत देणे.

३) अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या प्रदान करणे.

४) केंद्रीय शिक्षण सल्लागार बोर्डावर अनुसूचित जातीना प्रतिनिधित्व देणेत यावे.

यासारख्या सवलतींची आवश्यकता आहे हे डॉ.आंबेडकरांनी प्रकर्षाने मांडले.

अनुसूचित जातींच्या आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी पुस्तकी शिक्षणापेक्षा तंत्रशिक्षणाची अधिक गरज आहे. या दृष्टीने तंत्रशिक्षण अधिक महत्वाचे आहे. पण ते फार महागडे सुद्धा आहे. म्हणून ते तंत्रशिक्षण अनुसुचित जातींच्या मुलांच्या आर्थिक क्षमतेपलिकडचे आहे. हे शिक्षण ते घेवूच शकत नाहीत आणि तंत्रशिक्षणाशिवाय त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याची सुतराम शक्यता नाही. यासाठी सरकारने त्यांना सहाय्य केले पाहिजे. अनुसूचित जातीच्या मुलांना शिकावू उमेदवार म्हणून सरकारने संधी द्यावी. रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन द्याव्यात त्यांना सरकारने शिष्यवृत्या द्याव्यात.[४१] तरच अनुसूचित जाती आर्थिक प्रगती होवू शकेल. त्यांना या सोयी सवलती दिल्या पाहिजेत. तरच मागासवर्गीय समाजाचा विकास होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'उच्च शिक्षण घेऊन तज्ञ झालेलाच समाजात अमूलाग्र आणि पोषक बदल करु शकतो. यासाठी ३ लाख रुपये अशा विद्यार्थ्यांना मुले याचा फायदा मी कौन्सीलर असताना घेऊ शकली. मात्र उच्च शिक्षणासाठी १९४६ सालापासून अस्पृश्य विद्यार्थ्यांना पाठविणे बंद झाले. काँग्रेस राजवटीत अस्पृश्यांच्या उच्चशिक्षणाचा अंकुर मोडून टाकण्यात आला.[४२] अशी सनसनीत टिका त्यांनी केली. गांधी आणि काँग्रेस ने अस्पृश्यप्रती काय केले. यामध्येही काँग्रेस व गांधीवरती टिकेचा भडीमार केला आहे.

## ८. स्त्रियांच्या शिक्षणाबाबत विचार

भारताला प्रगती साधावयाची असेल तर स्त्रियांनाही समान दर्जा देऊन बरोबरीने घेऊन जावे लागेल. तरच उद्याचा भारत सुजलाम -सुफलाम बनेल अशी डॉ.बाबासाहेब आंबडेकरांची धारणा होती. भारतीय समाज व्यवस्थेने स्त्रीयांना दुय्यम दर्जा दिला होता. त्यांचे हक्क अधिकार हिरावून घेतले होते. चूल आणि मूल या चारभिंतीच्या आतच तिचे विश्व कोंडले घेतले होते. स्त्री जात द्वेषभूलक राजकारण,

समाजकारणाने या देशाला ग्रासले आहे. याचा परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. म्हणूनच त्यांनी ४ ऑगस्ट १९१३ साली न्यूयार्क मधून आपल्या वडीलांच्या मित्रांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात ,

"आपणास चांगले दिवस यावयाचे असतील आणि प्रगतीपथावर आपली वाटचाल अधिक गतीने व्हावयाची असेल तर मुलांच्या शिक्षणासोबत मुलींच्या शिक्षणाचाही तेवढयाच गंभीरतेने विचार करावा लागेल असे ते म्हणतात.[४३]

२० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे अखिल भारतीय दलित महिला परिषदेप्रसंगी डॉ.आंबडेकरांचे भाषण झाले. यावेळी जनसमुदायापुढे बोलताना ते म्हणाले,' स्वच्छ राहण्यास शिका व सर्व दुर्गणापासून मुक्त रहा. तुमच्या मुलांना शिक्षण द्या. हळूहळू त्यांच्या मनात महत्वाकांक्षा जागृत करा ते थोर पुरुष होणार आहेत. असे त्यांच्या मनावर बिंबवा, त्यांच्यातील हिनगंड नाहीसा करा. लग्न करण्याची घाई करु नका. आपल्या लहानपणी आपणाला मिळू शकली. त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्या प्रत्येक मुलाला देणे हे आई वडीलांचे कर्तव्य आहे. सर्वात अधिक महत्वाचे म्हणजे प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कामात सहकार्य द्यावे. मात्र गुलामासारखे वागण्यास खंबीरपणे तीने नकार द्यावा. व समतेसाठी आग्रह धरावा."

२० जुलै १९४२ रोजी मजूरमंत्र्यांच्या खात्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारुन मुंबईला परत आले. तेव्हा मुंबईतील दलित समाजातील स्त्रीयांनी त्यांच्या अभिनंदनाची सभा श्रीमती दोंदे यांच्या अध्यक्षतेखाली भरविली. यावेळी बोलताना डॉ. आंबडेकर म्हणाले ,

अस्पृश्य वर्गीय शिक्षित तरुण मुलींनी उच्चवर्णीय तरुणांशी लग्न करु नये . असा उपदेश केला. महार स्त्रियांच्या ठिकाणी राजकीय जागृती इतर मराठी भंडारी किंवा आग्री स्त्रीयांच्या पेक्षा अधिक प्रमाणात झाली आहे हे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले "

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्री स्वातंत्र्याचे भोक्ते होते, कारण त्यांच्या गुरु परंपरेत

गौतम बुद्धापासून म.फुले पर्यंत सर्वांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला पण प्रस्थापित समाज व्यवस्थेमुळे भारत देश स्त्रियांवरील वर्षानुवर्षाच्या बंधनामुळे फारशी क्रांती करु शकला नाही, नव्हे तर पारतंत्र्य त्यांच्या नशीबी येण्यामागे अनेक कारणापैकी हे एक कारण आहे. अशी विचारधारा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची होती. म्हणून त्यांनी सहशिक्षणाचा पुरस्कार केला आहे. मुलांच्या बरोबरीने मुलींना शाळेत शिकविले पाहिजे. या मताचे डॉ.आंबेडकर होते.हे यावरुन दिसून येते.

डॉ.आंबेडकरांनी १९२७ साली महाड सत्यागृहात प्रथम स्त्रियांनी एकत्र येऊन कार्य करण्याची, अस्पृश्यता दर्शक चिन्हे दागिने न वापरण्याची इच्छा प्रदर्शित करतात व पतीची मैत्रिण म्हणून राहण्याची इच्छा व्यक्त करतात.समाजातील स्त्रीच्या विचारात बदल झाल्याखेरीज समाजसुधारणेची गती वाढणार नाही.हेत्यांना कळून चूकले होते.

अस्पृश्य शिक्षित मुलींनी स्पृश्य मुलांशी विवाह केल्यास आपल्या समाजातील शिक्षित स्त्रीचे मिळणारे नेतृत्व इतर समाजात जाईल.कारण त्यांची गरज तत्कालीन समाजाला होती. आणि खास करुन शिक्षणासाठी नेतृत्वाची प्रकर्षाने गरज होती.याची जाणीव डॉ.आंबेडकरांना होती.

इतर समाजाप्रमाणेच दलित स्त्री पुरुष प्रधान संस्कृतीची गुलाम होती. व पुन्हा दलित पुरुष सत्ताक पद्धतीचे चटके तिला सोसावे लागत होते. त्यामुळे या दोन्हीतून बाहेर पडून पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेऊन समाज सुधारावा असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

## ९. वसतिगृहे :मागासवर्गीयांच्या शिक्षणाची गरज

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ साली बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली. या संस्थेच्या उद्देशामध्ये अनेक विषयासोबत बहिष्कृत वर्गात शिक्षणप्रसार करणे, वाचनालये स्थापने, विद्यार्थी वसतिगृहे काढणे, लायक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या देणे व देवविणे इ.बाबींचाही गांभीर्याने विचार केला गेला. त्या अनुषंगाने बहिष्कृत

वर्गाच्या शैक्षणिक उन्नतीकरीता वसतिगृहाच्या चळवळीने महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये जोर धरला होता. मुंबई विधान मंडळातील शिक्षण अनुदान विधेयकावरती (१२ मार्च १९२७) चर्चा करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वसतिगृहाबाबत आपले मत मांडताना म्हणतात. शिष्यवृत्ती पेक्षा वसतिगृहे महत्वाची कारण सरकार देत असलेल्या शिष्यवृत्ती रुपी अर्थसहाय्य मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या कधीही सत्कारणी खर्च होणार नाही. हा जनतेच्या पैशाचा अपव्यय आहे. म्हणून ज्या उद्देशाने हे अर्थसहाय्य दिले जाते तो उद्देश निष्फळ होतो त्याचबरोबर शिष्यवृत्तीने मुले आपल्या ध्येयापर्यंत पोहोचूच शकणार नाहीत. कारण मागासवर्गीय जातीजमातीची मुले ही अत्यंत दूषित वातावरणात वाढतात त्यामुळे मध्येच कोठेतरी शिक्षण सोडून देतात. अशा प्रकारे त्यांच्यावर खर्च होणारा पैसा व्यर्थ जातो म्हणून शिष्यवृत्तीवर खर्च होणारा हा पैसा शासनाद्वारे किंवा खाजगी संस्थाद्वारे संचलित वसतिगृहांच्या स्थापनेवर खर्च करणे योग्य होईल. खाजगी संस्थांनी वसतिगृहे चालविली तर शासनाचा पैसाही वाचेल.''[४६] १९२०च्या माणगांव परिषदेच्या वेळी डॉ.आंबेडकरांनी कोल्हापूरातील शाहू महाराजांनी सुरु केलेली २३ वसतिगृहे पाहिली होती.यामध्ये 'मिस क्लार्क होस्टेल' हे अस्पृश्यासाठी स्वतंत्र वसतिगृह होते. यामुळे कोल्हापूर मध्ये मागासवर्गीयांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत झाली.याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच आपल्या बहिष्कृत हितकारिणी सभेतर्फे वसतिगृह सुरु करण्याचे ठरविले होते.

बहिष्कृत हितकारणी सभेच्या कार्यकारी कमिटीची सभा गुरुवार दि.२३/११/१९२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. सभेस रा. कोळोखे, गोविंद परमार,झिणाभाई राठोड,शिवतरकर,गायकवाड,डोळस,जाधव इतके सभासद हजर होते.यातील पहिला ठराव हा सोलापूर शहरी बोर्डिंग काढण्याकरिता तसेच जागा व ग्रॅंट मिळविण्याबद्दल संबंधीतांच्या भेटी घेण्याचा अधिकार डॉ.आंबेडकरांना राहील असे ठरले आणि पुढे १९२५मध्ये सोलापूर येथे दलित मुलासाठी वसतिगृह सुरु

झाले."[४७]

थोडक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचे प्राथमिक,माध्यमिक व महाविद्यालयीन **शिक्षणासंबंधीचे विचार अतिशय मूलगामी व विचार प्रवर्तक वाटतात. गरीब खेड्यातील** विद्यार्थी शिकला पाहिजे. स्त्री शिक्षणाला शासनाने प्राधान्य दिले पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. भारतीय राज्यघटनेत सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे असे कलम घातलेले आहे. त्याचा त्यांनी अतिशय विचारपूर्वकपणे समाविष्ट केला आहे. भारताला सर्व बाजूंनी प्रगतीपथावर आणावयाचे असेल तर भारतीय समाज हा सुशिक्षित झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जगातल्या सर्वोत्कृष्ट व नामांकित विद्यापीठात आपले शिक्षण पूर्ण केले होते. केंब्रीज, ऑक्सफर्ड, कोलंबिया विद्यापीठाप्रमाणे आपल्या भारतातीलही विद्यापीठांनी कामे केली पाहिजेत असे त्यांना वाटत होते व हे ते आमदार, खासदार, व मंत्री असताना वेळोवेळी बोलवून दाखवित होते. मुंबई विद्यापीठाचे कामकाज व त्यातील त्रुटी त्यांना माहित होत्या. यासंबंधात त्यांनी काही उपाय योजनाही सुचविल्या होत्या. भारतात सांस्कृतिक क्रांती जर व्हावयाची असेल तर मागासलेल्या समाजातील मुले इतर समाजातील मुलांच्याबरोबर शिकली पाहिजेत.अशी त्यांची तळमळ होती. दुदैवाने त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या सर्वच शिक्षण विषय योजना व कल्पना स्वतंत्र भारतात फुलद्रुप झाल्या नाहीत हे याठिकाणी आवर्जून नमूद करावयासे वाटते.

हे सर्व विचार ते मांडत असताना त्यांना याचीही जाणीव होती की, हे विचार आपल्या लोकांपर्यंत कसे पोहचवायचे म्हणून त्यांनी 'मुकनायक',बहिष्कृत भारत', 'जनता','प्रबुद्ध भारत'इ. वृत्तपत्रे चालवली निरक्षर मागासवर्गीय हे वाचनाणार तरी कसे म्हणून त्यांना कार्यकर्ते तयार केले. विविध सभांतून पटवून दिले. येथे त्यांच्यावर दोन जबाबदाऱ्या दिसतात. शासन दरबारी आपली मते मांडून त्यास सरकारचे मत आपल्या बाजूने वळवून घेणे. त्यानंतर आपल्या लोकांपर्यंत या गोष्टी पोहचवून त्यांच्यात शिक्षणाबद्दल

जाणीव जागृती निर्माण करणे .परकियांचे राज्य,पेशवाईंची धार्मिक सामाजिक बैठक १९२०-४९ या काळातील स्वातंत्र चळवळीची वैचारिक पार्श्वभूमी, अस्थिर राजकीय वातावरण, या सर्वांमध्ये मागासवर्गीयांच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षणाबाबत ही मूलगामी वैचारिक भूमिका त्यांनी मांडली त्यासाठी लागणारी प्राथमिक बैठक तयारी त्यांनी केली. त्यामुळे १९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यावर घटनेमध्ये त्यांना या बैठकीचा वापर करता आला. आज मागासवर्गीयांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख हा या १९२० ते १९५६ सालातील वैचारिक बैठकीवरच जोपासलेला दिसून येतो.

# संदर्भ साधने व तळटीपा

१. कीर धनंजय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९ पृष्ठ १.

२. कित्ता

३. आंबेडकरांचे भाषण, जनता २० नोव्हें १९३७.

४. कीर धनंजय, उपरोक्त ,पृष्ठ १८.

५. कित्ता पृष्ठ २५.

६. कित्ता पृष्ठ ३४.

७. शिवतरकर, सी. ना. जनता खास अंक, एप्रिल १९३३.

८. चां.भ.खैरमोडे , डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवनचरित्र खंड १,पृष्ठ ६६.

९. मूकनायक, दि. ९ ऑक्टोबर, १९२०.

१०. मूकनायक, दि. २८फेब्रुवारी, १९२०.

११. कित्ता.

१२. दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद, २१ व २२ मार्च १९२०, माणगाव कागल संस्थात ( मूकनायक ) .

१३. भारतीय सवैधानिक आयोगापुढे मुंबई प्रेसिडेंसी मधील दलीत वर्गाच्या शैक्षणिक अवस्थेविषयी निवेदन, २९ मे १९२८.

१४. बहिष्कृत हितकारिणी सभा वृत्तांत, १९२४-२८.

१५. मून वसंत ( संपादित )डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे. खंड २

१६. बहिष्कृत भारत, डॉ.आंबेडकरांचा अग्रलेख, आप घरी बाटा आणि बाप घरी ही बाटा १५ जुलै १९२७.

१७. कित्ता.

१८. शिक्षण अनुदान विधेयक, मुंबई विधानमंडळातील चर्चा १२ मार्च १९२७ .

१९. बहिष्कृत भारत १५ जुलै , १९२९.

२०. कित्ता .

२१. मून वसंत, उपरोक्त.

२२. बहिष्कृत भारत, डॉ. आंबेडकरांचा अग्रलेख, ३१ मे १९२९ .

२३. कित्ता

२४. कित्ता

२५. सवैधानिक आयोगापुढे दलित वर्गाच्या शैक्षणिक स्थिती संबंध मांडलेली कैफियत, २९ मे १९२८ .

२६. बहिष्कृत भारत, उपरोक्त.

२७. कित्ता

२८. कीर धनंजय, उपरोक्त. पृष्ठ १३२-१३३.

२९. कित्ता, पृष्ठ १३३.

३०. कित्ता, पृष्ठ १३५.

३१. मून वसंत, उपरोक्त.

३२. कित्ता

३३. शिक्षण अनुदान विधेयक, मुंबई विधान मंडळातील चर्चा, १२ मार्च १९२७.

३४. जनता, दि .१५ सप्टेंबर, दि. २२ सप्टेंबर १९५१.

मिलिंद, महाविद्यालयाच्या इमारतीची कोनशिला ( १ सप्टेंबर १९५१ ) बसविण्यात आली, त्याप्रसंगी डॉ.आंबेडकरांचे भाषण.

३५. संवैधानिक आयोग, उपरोक्त.

३६. संचालक जनसूचना खाते, मुंबई प्रांत अहवाल १९२३-२४ .

३७. मून वसंत, उपरोक्त.

३८. मुंबई विद्यापीठ पुर्नरचना समितीपुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लेखी साक्ष. १५ ऑगस्ट १९२४.

३९. कित्ता

४०. महामहीम गर्व्हनर जनरल यांना सादर केलेले मेमोरंडम, २९ ऑक्टो १९४२ .

४१. कित्ता

४२. जनता, दि. १० व २४ नोव्हेंबर १९५१

४३. डॉ. आंबेडकरांचे खाजगीपत्र ४ ऑगस्ट १९१३

४४. गायकवाड प्रदीप , दलितांचे शिक्षण ( संपा. ) - क्षितीज पब्लिकेशन नागपूर,२००४.

४५. कीर धनंजय उपरोक्त , पृष्ठ ३६४ .

४६. शिक्षण अनुदान विधेयक , उपरोक्त.

४७. बहिष्कृत हितकारिणी सभावृत्तांत १९२४-२८ .